# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक :-२६५/२०२२ दिनांक :- ३०/०८/२०२२

## CREDIT CARD द्वारे फसवणूक रक्कम ९८,५००/- रुपये परत मिळवण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नयानगर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसम तारीक कुरेशी यांचे क्रेडीट कार्डद्वारे २,६४,२३२/- रुपये रक्कम दिनांक २५/०८/२०२२ रोजी पहाटे ०४.३२ वाजेचे सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने काढून घेतलेबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकरीता तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक १४०२-बी/२०२२ दिनांक २५/०८/२०२२ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत त्यांचे बँकेकडून माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीच्या आधारे ०३ व्यवहार पेटीएम, पेयु मनी, मोबीक्विक या पेमेंट गेटवेद्वारे करण्यात आल्याचे दिसून आले. नमूद पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम कोणत्याही न्यायालयीन प्रक्रीयेविना ९८,५००/- रुपये पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **क्रेडीट कार्ड द्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कोठेही सेव्ह करु नये.**
- **क्रेडीट कार्ड वापर कर्त्याने ट्रान्सक्शनचे प्रत्येक एसएमएस तपासावे, त्यामध्ये काही अनियमितता असल्यास तात्काळ संबंधित बँकेस व सायबर सेलकडे तक्रार करावी.**
- **कोणताही अनोळखी कॉल आल्यास क्रेडीट कार्ड/बँकेशी संबंधित माहिती देवू नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड संबंधित ओटीपी शेअर करु नये.**

**मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे क्रेडीट कार्ड/बँक व्यवहारामध्ये फसवणूक झाल्यास तात्काळ संबंधित बँकेला माहिती द्यावी, तसेच नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति.कार्य.पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोलीस अंमलदार /१२०९५ गणेश इलग, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंमलदार/ १३१०४ पल्लवी निकम , महिला पोलीस अंमलदार/१३०८७ अमिना पठाण यांनी पार पाडली आहे.


सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


**----0000----**